किसान शिक्षण संस्था , वाळवा

# क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा .

भूगोल विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आणि

## शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर

यांच्या संयुक्त विद्यमाने

बी.ए. भाग -२ भूगोल (सेमिस्टर -५ ) पेपर नं. ५ सागरशास्त्र आणि पेपर नं. ६ कृषी भूगोल एक दिवसीय सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळा

बुधवार दिनांक : १८/१०/२०२३

# अहवाल

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. जाधव कृष्णात राजाराम | प्रा. डॉ. सुषमा अरुण नायकवडी |
| कार्यशाळा समन्वयक | प्राचार्य |

# बी.ए. भाग – २ भूगोल (सेमिस्टर -४ ) पेपर नं. ५ सागरशास्त्र व पेपर नं. ६ कृषी भूगोल सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळा बुधवार दिनांक : १८/१०/२०२३ अहवाल

क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय , वाळवा येथील भूगोल विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने बी.ए. भाग – २ भूगोल (सेमिस्टर -४ ) पेपर नं. ५ सागरशास्त्र व पेपर नं. ६ कृषी भूगोल सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळा आयोजित करण्यासंदर्भात प्रस्ताव विद्यापीठाकडे दिलेला होता. त्यानुसार विद्यापीठाने आमच्या विभागास बी.ए. भाग – २ भूगोल (सेमिस्टर -४ ) पेपर नं. ५ सागरशास्त्र व पेपर नं. ६ कृषी भूगोल सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळा आयोजित करण्याची परवानगी शिवाजी वि./सेमिनार /नबअकाआ/२०२३-२०२४/१७७ दिनांक :३ ऑक्टोबर २०२३ च्या संदर्भ पत्राने देण्यात आलेली होती. त्यानुसार सदरच्या कार्यशाळेचे आयोजन बुधवार दिनांक : १८/१०/.२०२३ रोजी करण्यात आलेले होते. सदरची कार्यशाळा हि नियोजित दिवशी व वेळेनुसार संपन्न झाली. या कार्यशाळेचा अहवाल पुढीलप्रमाणे:

- **कार्यशाळेसाठी नाव नोंदणी :**

सदरच्या कार्यशाळेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांना कार्यशाळा आयोजनाचे निमंत्रण पत्र ई मेलव्दारे पाठविण्यात आले होते. सोशल मिडियाच्या माध्यमातून प्राध्यापक यांना सहभागी होण्यासंदर्भात आवाहन केलेले होते. याशिवाय संयोजनाच्या सोयीसाठी गुगल फॉर्मच्या माध्यमातून कार्यशाळेसाठी नाव नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. शिवाय प्रत्यक्ष कार्यशाळेच्या दिवशी स्पॉट रजिस्ट्रेशनची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली होती. या सर्व प्रयत्नामुळे या कार्यशाळेसाठी १०० प्राध्यापक उपस्थित होते.

- **बीजभाषक व तज्ञ साधन व्यक्ती :**

शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर भूगोल व भूगर्भ शास्त्र अभ्यास मंडळ यांच्या बरोबर चर्चा करून जे प्राध्यापक अभ्यासक्रम बदलाच्या उपसमितीचे सदस्य होते त्यांना साधन व्यक्ती म्हणून निमंत्रित केले. त्यानुसार शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर

भूगोल व भूगर्भ शास्त्र अभ्यास मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष मा. प्रा. डॉ. बाळासाहेब जाधव , भूगोल विभागप्रमुख , श्री. विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय, पेठवडगाव यांना बीजभाषक म्हणून तर प्राचार्य डॉ. अरुण पाटील , कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, इस्लामपूर, डॉ. पी.डी. भाकरे , भूगोल विभागप्रमुख , कृष्णा महाविद्यालय रेठरे बुद्रुक , प्रा. डॉ. प्रसन्ना पाटील , भूगोल विभाग प्रमुख , प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय देऊर , प्रा. डॉ. सर्जेराव गायकवाड , भूगोल विभागप्रमुख , आर्ट्स आणि कॉमर्स कॉलेज, आष्टा आणि प्रा. डॉ. तुषार घाटगे भूगोल विभाग प्रमुख , जयसिंगपूर कॉलेज , जयसिंगपूर या सर्वांची साधन व्यक्ती म्हणून त्यांना नियुक्ती पत्रे देण्यात आली.

- **कार्यक्रम पत्रिका :**

बी.ए. भाग – २ भूगोल (सेमिस्टर -४ ) पेपर नं. ५ सागरशास्त्र व पेपर नं. ६ कृषी भूगोल सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळा आयोजन करताना उद्घाटन , बीजभाषण , सत्र -१ ते ४ या सर्वांच्या कार्यक्रम पत्रिका तयार करून त्याचे सर्व सहभागी प्राध्यापक यांना वितरण करण्यात आलेले होते.

- **तांत्रिक तयारी :**

कार्यशाळेच्या यशस्वी संयोजनासाठी महाविद्यालयाच्या कार्यकुशल प्राचार्या डॉ. सुषमा अरुण नायकवडी यांनी स्टेज, नाव नोंदणी , प्रमाणपत्र वितरण , चहा , नाश्ता व भोजन अशा स्वरूपाच्या समिती तयार करून त्यांचा वेळोवेळी आढावा घेतला जात होता. प्रमाणपत्र वितरण समितीने आवश्यक तेवढी प्रमाणपत्रांची छपाई करून घेतलेली होती. तर इतर सर्व समिती प्रमुख व सदस्य यांनी आवश्यक ती तयारी केलेली होती.

❖ **उदघाटन**:

सदरच्या कार्यशाळेचे उद्घाटन कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय , इस्लामपूरचे प्राचार्य डॉ. अरुण पाटील यांच्या हस्ते झाले. त्यांनी आपल्या उद्घाटन मनोगत व्यक्त करताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या विद्यार्थ्यांना होणाऱ्या फायद्यांचा मागोवा घेतला त्याचबरोबर या धोरणाचे महाविद्यालयावर होणारे परिणाम यावर प्रकाशझोत टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. सुषमा

नायकवडी यांनी अभ्यासमंडळानी सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम तयार करताना स्थानिक पातळीवरील समस्या व त्याच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजना, स्थानिक पातळीवर उपलब्ध असणारी संसाधने व त्यावर कराव्या लागणाऱ्या प्रक्रिया –उत्पादन – वितरण – विक्री यांचा समावेश अभ्यासक्रमात झाल्यास अथवा असे कोर्सेस सुरु केल्यास विद्यार्थ्यांची कौशल्य विकसित होतील असे मत मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. जाधव के. आर. यांनी केले तर आभार प्रा. डॉ. जी. एन. ढोबळे यांनी मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. राजा माळगी यांनी मांडले.

## ❖बीजभाषण

या कार्यशाळेच्या बीज भाषणासाठी शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर भूगोल व भूगर्भ शास्त्र अभ्यास मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष मा. प्रा. डॉ. बाळासाहेब जाधव , भूगोल विभागप्रमुख , श्री. विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय, पेठवडगाव यांना निमंत्रित करण्यात आलेले होते. या सत्राचे अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. रत्नदीप जाधव यांनी काम पाहिले. प्रा. डॉ. बी.एस. जाधव यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण याचे २०२३ - २०२४ पासून असणारे स्वरूप – मेजर व मायनर विषय त्यांची निवड , इतर विषय त्याचे कोर्सेस , क्रेडीट गुण याबद्दल सखोलतेने मार्गदर्शन केले. भूगोल विषयाची उपयोगिता वाढविण्यासाठी आव्हानात्मक बदल स्वीकारणे आवश्यक आहे तरच आपला विषय व विषय घेणारा विद्यार्थी टिकू शकेल असे मत मांडले.

❖ मुख्य मार्गदर्शन सत्रे:

सत्र : १

प्रथम सत्र यामध्ये भूगोल पेपर नं. ५ सागरशास्त्र या पेपरमधील मोड्यूल नं. १ व २ यावर डॉ. पी.डी. भाकरे , भूगोल विभागप्रमुख , कृष्णा महाविद्यालय रेठरे बुद्रुक यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. अमोल जरग यांनी काम पाहिले. या सत्रात प्रा. डॉ. प्रवीण भाकरे यांनी पुढील घटक कशा प्रकारे विद्यार्थ्यांना शिकवावेत हे स्पष्ट केले.

सत्र: २ दुसऱ्या सत्रामध्ये भूगोल पेपर नं. ५ सागरशास्त्र या पेपरमधील मोड्यूल नं. ३ व ४ व ५ यावर डॉ. प्रसन्ना पाटील , भूगोल विभागप्रमुख , प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय , देऊर यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ.

महमद पटेल यांनी काम पाहिले. या सत्रात डॉ. प्रसन्ना पाटील यांनी पुढील घटक कशा प्रकारे विद्यार्थ्यांना शिकवावेत हे स्पष्ट केले.

सत्र: ३

तृतीय सत्र यामध्ये भूगोल पेपर नं. ६ कृषी भूगोल या पेपरमधील मोड्यूल नं. १ व २ यावर डॉ. एस.ए. गायकवाड , भूगोल विभागप्रमुख , आर्ट्स आणि कॉमर्स कॉलेज , आष्टा यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. प्रा. डॉ. श्रीकृष्ण गायकवाड यांनी काम पाहिले. या सत्रात प्रा. डॉ. एस.ए. गायकवाड यांनी पुढील घटक कशा प्रकारे विद्यार्थ्यांना शिकवावेत हे स्पष्ट केले.

सत्र : ४ चौथ्या सत्रामध्ये भूगोल पेपर नं. ६ कृषी भूगोल या पेपरमधील मोड्यूल नं. ३ व ४ , ५ यावर डॉ. तुषार घाटगे, भूगोल विभागप्रमुख , जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. संजय साळोखे , भूगोल विभागप्रमुख, भोगावती महाविद्यालय, कुरुकली यांनी काम पाहिले. या सत्रात प्रा. डॉ. तुषार घाटगे यांनी पुढील घटक कशा प्रकारे विद्यार्थ्यांना शिकवावेत हे स्पष्ट केले.

वरील प्रमाणे सर्व सत्रात प्रमुख मार्गदर्शक यांचे मार्गदर्शन , त्यावर उपस्थित सहभागी प्राध्यापक यांचे प्रश्न अथवा शंका याची चर्चा योग्य प्रकारे झाली.

❖ समारोप :

सदरच्या कार्यशाळेचा समारोप मा. एन.एस. पाटील , समन्वयक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष , क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय , वाळवा यांच्या अध्यक्षतेखाली व मा. प्रा. डॉ. आर.एस.कदम , जेष्ठ प्राध्यापक व भूगोल अभ्यास मंडळ सदस्य , प्रा. डॉ. एस.बी. गायकवाड व प्रा. डॉ. मुलाणी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सर्व वक्ते यांनी कार्यशाळेची उपयुक्तता स्पष्ट करीत असताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी योग्यरित्या होण्यासाठी वारंवार अशा प्रकारच्या चर्चेचे आयोजन करावे अशी अपेक्षा व्यक्त करून कार्यशाळेचा समारोप झाला. कार्यशाळेचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. यादव पी.डी. यांनी केले तर आभार प्रा. जी.एन . ढोबळे यांनी व्यक्त केले. सूत्र संचलन प्रा. माळगी एम. एस. यांनी व्यक्त केले.



Key Note Address: Dr. B.S. Jadhav



Session Discussion



Resource Person: Dr. R.G. Jadhav



Resource Person : Dr. P.V. Patil



Resource Person : Dr. M.A. Patel



Valedictory Function: Dr. S.B. Gaikawad

प्रा.डॉ.जाधव कृष्णात राजाराम
कार्यशाळा समन्वयक

डॉ. नायकवडी सुषमा अरुण
प्राचार्य